| MHNS240019692019 | **<u>नियमित दिवाणी दावा क्र.२०४/२०१९ मधील नि.क्र.३३ वरील आदेश</u>**<br>श्री.काशिनाथ उत्तम देवरे व इतर<br>वि.<br>श्री. मधुकर निंबा आहिरे व इतर |
|---|---|

प्रस्तुतचा दावा हा अतिक्रमण काढुन मिळण्याकरीता दाखल केला आहे. नि.क्र.३३ वर, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (यापुढे ज्याचा उल्लेख 'संहिता' असा करण्यात आला आहे.) चे क्रम ६, नियम १७, अन्वये दाखल केलेल्या अर्जाद्वारे वादी हे वादपत्रामध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी मागत आहेत. अर्जात नमुद कथन संक्षिप्तपणे पुढीलप्रमाणे विषद करता येईल. दावामिळकीची मोजणी झाल्यानंतर प्रतिवादी क्र.१३ यांनी वादीच्या शेतजमीनीत अतिक्रमण केल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे, वादींनी या अर्जाव्दारे वाद पत्रातील परिच्छेद क्र.०५ आणि १२क अर्जामध्ये नमुद काही मजकूर नव्याने दाव्यामध्ये सामाविष्ट करून दुरूस्ती करण्यास परवानगी मागीतली आहे. अर्जास वादी यांच्या शपथपत्राची पुष्टी आहे.

२. प्रतिवादी यांनी सदर अर्जावरच खुलासा दाखल करून वादीच्या अर्जास प्रखर आक्षेप घेऊन अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

३. वादीतर्फे विधिज्ञ श्री.एस.एस.शिंदे यांचा व प्रतिवादी तर्फे त्यांचे विधिज्ञ श्री. एस.आर. सोनवणे यांचा तपशिलवार युक्तिवाद ऐकला.

४. दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे क्रम ६, नियम १७ पुढीलप्रमाणे उध्दृत करते. :–

*''१७. न्यायालयास कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यावर दोहोंपैकी कोणत्याही पक्षकारास, त्याच्या वादकथनास न्याय्य असेल अशा रितीने व अशा अट्टींवर बदल करण्याची किंवा दुरुस्ती करण्याची मुभा देता येईल आणि पक्षकारांमध्ये वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न अभिनिर्णित करण्यासाठी आवश्यक असतील त्याप्रमाणे अशा सर्व दुरुस्त्या केल्या पाहिजेत.*

*परंतु, वाजवी दक्षता बाळगुन सुध्दा, वादाची चौकशी आरंभ होण्यापूर्वी, तो पक्ष, अशी दुरुस्ती मागणी करु शकली नाही असे न्यायालय निष्कर्षाप्रत आल्याशिवाय, दाव्याच्या सुनावणीची सुरुवात झाल्यानंतर, असा दुरुस्तीचा अर्ज मान्य करता येणार नाही.''*

५. अभिलेखाची पाहणी केली असता वादी यांनी अतिक्रमण काढुन मिळणेकरीता सदर दावा दाखल केलेला आहे. वादी यांची अर्जातील मागणी मंजूर केल्यास दाव्याच्या स्वरूपात कोणताही बदल होणार नाही. सदर दुरूस्तीमुळे प्रकरण गुणदोषावर तसेच, उभय पक्षकारांमधील वाद संपूर्ण वादाचे एकाच दाव्यामध्ये निराकारण होऊन न्यायनिर्णीत होण्यास मदत होणार आहे. सदर अर्ज मंजुर केल्यावर उभय पक्षकारांमध्ये विविध प्रकरणे दाखल होणार नाहीत व गुंतागुंत वाढणार नाही. सदर दाव्यामध्ये वादाचे मुद्दे अद्यापही नोंदविण्यात आलेले नाही. त्यामुळे, वादीचा प्रस्तुत अर्ज संहितेचे क्रम ६, नियम १७ अन्वये मान्य करता येईल. सबब, निम्न आदेश.

## आ दे श

नि.क्र.३३ वरील वादीचा वादपत्र दुरुस्तीचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

वादींनी या आदेशाच्या दिनांकापासून १४ दिवसाच्या आत उपरोक्त प्रमाणे वादपत्रात दुरुस्ती करावी व दुरुस्ती दाव्याची प्रत व त्याच्या पुरेश्या प्रतींसह व हुकूमनाम्यासाठीच्या प्रतीसह अभिलेखावर दाखल करावे.

SHIPKULE CHARUDATTA

Digitally signed by SHIPKULE CHARUDATTA
Date: 2024.09.25 13:26:24 +0530

दि. २५/०९/२०२४ (चारूदत्त उद्धव शिपकुले)

ठिकाण– सटाणा दिवाणी न्यायाधिश क. स्तर, सटाणा.